# कै. दिवाकर स्मृती नाट्यछटा स्पर्धा उत्साहात



पुणे : कै. दिवाकर स्मृती नाट्यछटा स्पर्धेच्या प्रथम क्रमांक पारितोषिक विजेत्यांसह उपस्थित मान्यवर.

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. ३१ -** नाट्य संस्कार कला अकादमी आयोजित कै. दिवाकर स्मृती नाट्यछटा स्पर्धा उत्साहात पार पडल्या. यंदाच्या स्पर्धेत पुणे केंद्रातून तब्बल ६०० हून अधिक स्पर्धकांनी भाग घेतला होता. यापैकी १२४ नाट्यछटा प्राथमिक फेरीतून अंतिम फेरीत पोहोचल्या होत्या. स्पर्धेची अंतिम फेरी व बक्षीस समारंभ रविवारी पार पडला.

यावेळी महापौर मुक्ता टिळक, मध्य प्रदेशातील इंदूर येथील मुक्तसंवादचे मोहनजी रेडगांवकर यांच्या हस्ते संध्या कुलकर्णी लिखीत 'नाट्यछटा पंचविशी' या पुस्तकाचे प्रकाशन झाले. यावेळी संस्थेचे प्रमुख विश्वस्त प्रकाश पारखी उपस्थित होते. संस्थेचे माजी विद्यार्थी सूरज पारसनीस, तेजश्री वालावलकर, अथर्व कर्वे, चिन्मयी गोस्वामी यांचा कौतुक सोहळा पार पडला. परिक्षक म्हणून अमोल जाधव, संध्या कुलकर्णी, दिपाली निरगुडकर, वैशाली गोस्वामी, आश्विनी आरे, दर्शन नाईक, अपूर्व साठे, विनिता पिंपळखरे, तृप्ती टिंभे, आशा काळे यांनी जबाबदारी पार पाडली. तर स्पर्धा प्रमुख म्हणून अनुराधा कुलकर्णी यांनी काम पाहिले. स्पर्धेची प्राथमिक फेरी ८ केंद्रांवर पार पडली. स्पर्धा प्राथमिक फेरीत ६ वेगवेगळ्या गटात झाल्या आहेत. यामध्ये शिशुगटापासून ते तरुण आणि जेष्ठांच्या गटाचा समावेश होता.

## नाट्यछटा स्पर्धेचा निकाल खालीलप्रमाणे

- **गट क्र. १ - शिशुगट**
  प्रथम - श्रीजय देशपांडे, द्वितीय - श्रीया जाधव, तृतिय - अक्षरा करकरे, उत्तेजनार्थ - सुमित्रा कुलकर्णी, त्रिशा डोंबाळे
- **गट क्र २ - १ ली / २ री**
  प्रथम - कौशिकी वझे, द्वितीय - सई भोसले, तृतिय - अक्षरा जाधव, उत्तेजनार्थ - स्वरांजली झांबरे, आरुष चंद्रात्रेय
- **गट क्र. ३ - ३ री / ४ थी**
  प्रथम - अनाहिता जोशी, द्वितीय - तन्वी केतकर, तृतीय - अमृता काळे, उत्तेजनार्थ - शर्वरी देवधर, आदिती बाबर, सुप्रिया कोंढकर
- **गट क्र. ४ - ५ वी ते ७ वी**
  प्रथम - यज्ञा मतकर, द्वितीय - दृष्टी मोरे, तृतीय - मुग्धा जोशी, उत्तेजनार्थ - अपुर्वा पाटील, अद्वैत राईलकर, आर्या काशीकर
- **गट क्र. ५ - ८ वी ते १० वी**
  प्रथम - शर्व वढवेकर, द्वितीय - अभिजीत शिंदे, तृतीय - सुहानी धडफळे, उत्तेजनार्थ - स्वानंद देशपांडे, आदित्य शेलार
- **गट क्र. ६ - खुला गट**
  प्रथम - विद्या ढेकणे, द्वितीय - अथर्व आगाशे, तृतीय - आरोही जेरे, उत्तेजनार्थ - योगिनी कानडे, सीमा रेळेकर

## नाट्यछटा लेखन पारितोषिक

- विद्यार्थी -प्रांजला धडफळे
- पालक - श्वेता देशमुख, राधा केतकर, मानसी वझे, श्रीकांत शामगांवकर
- शिक्षक - नुपुरा किर्लोसकर, अनुराधा कुलकर्णी, अंजली दफ्तरदार